<u>वाचा</u>-

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 30 व 31-अ
2) महा.महानगरपालिका अधि.अनुसुची ड' चे प्रकरण 2 मधील नियम क्र.1 (क),(ह),(आय)

जा.क्र./लाशमनपा/नसवि/10/2026
लातूर शहर महानगरपालिका, लातूर
(महापालिका सचिव यांचे कार्यालय)
दिनांकः- 28/07/2026

**प्रति,**

**श्री./श्रीमती** -----------------------------------------------------,

-----------------------------------------------------------------,

सन्मा.सदस्य/सदस्या,

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

यादवारे आपणास कळविण्यात येते की, लातूर शहर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा दि. 05.08.2026 बुधवार रोजी सकाळी ठीक 11.00 वाजता कै.यशवंतराव चव्हाण सभागृह येथे आयोजीत करण्यात आलेली आहे.

तरी आपण सदरील सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

**महापालिका सचिव,**
**लातूर शहर महानगरपालिका, लातूर**

**मा.सर्वसाधारण सभेची सूचना**

**<u>कार्यपत्रिका क्र. 5</u>**

| **अ.क्र.** | **विषय** |
|---|---|
| 1 | दि.10.03.2026 रोजीचे मागील सभेचे इतिवृत्त कायम करणेबाबत. |
| 2 | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 30(1) नुसार महिला व बालकल्याण समिती सदस्यांची नेमणूक करणे आवश्यक आहे. सदर नियुक्ती ही कलम 31-अ नुसार प्रमाणशीर प्रतिनिधत्व देऊन करण्यात येईल. प्रत्येक पक्षाच्या गटनेत्यांनी त्यांच्या पक्षाच्या तौलनिक संख्याबळाप्रमाणे अनुज्ञेय संख्येच्या प्रमाणातच महिला व बालकल्याण समिती (13) सदस्यांसाठी त्यांच्या पक्षाच्या सदस्यांचे नामनिर्देशन करणे आवश्यक आहे. |
| 3 | लातूर शहर महानगरपालिका हद्दीमध्ये शासनाचे नियमाप्रमाणे गुंठेवारीस मुदतवाढ देणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे. |
| 4 | लातूर शहर महानगरपालिकेच्या विविध विकास प्रकल्पांकरीता कर्ज / कर्ज रोखे (बॉन्ड) उभारणेबाबत चर्चा करणे. |
| 5 | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 26 अन्वये विकास योजना मुदतवाढीचा प्रस्तावावर विचार विनिमय करून निर्णय घेणे. |
| 6 | शहरात आवश्यक ठिकाणी पॅचवर्क करणेसाठी चर्चा करणे. |
| 7 | शहरातील पिण्याचे पाणी पिवळे येऊ नये म्हणून केमिकल लॅब उभारणी करणे व त्यासाठी एन.सी.एल.पुणे यांची लॅब सल्लागार म्हणून नियुक्ती करणेसाठी चर्चा करणे. |

| | |
|---|---|
| 8 | रु.110 कोटींचा भांडवली गुंतवणूक प्रस्ताव सादर करणे. गंजगोलाई शॉपिंग कॉम्प्लेक्स व विवेकानंद चौक पाणी टाकी, अण्णाभाऊ साठे पार्कींग, भाजी मार्केट, नवयुग थेटर जवळील मनपाच्या मालकीची जागा व इतर प्रकल्प उभारणेबाबत विचार विनिमय करून चर्चा करणे. |
| 9 | प्रभाग क्र.13 मधील प्रकाश नगर येथील नालंदा बौद्ध विहाराचे दुस-या मजल्याचे बांधकाम व सुशोभीकरण करणेबाबत |
| 10 | व्यवसायिकांना अग्नि सुरक्षा पूर्तता प्रमाणपत्र देणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे. |
| 11 | महापौर यांचेसाठी निवासस्थान बांधणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे |
| 12 | लातूर शहरातील मोहन नगर भागातील अतिक्रमण नियमानुकूल करणेबाबत चर्चा करणे. |
| 13 | हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे योजनेअंतर्गत मनपा शाळांचे आधुनिकीकरण करणेबाबत निर्णय घेणे |
| 14 | हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे लोककल्याण योजनेअंतर्गत आरोग्य विभागाकरीता आवश्यक उपकरणाबाबत चर्चा करणे. |
| 15 | हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे योजनेअंतर्गत लातूर शहरासाठी प्रस्तावीत कामास मंजूरी देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे. |
| 16 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे 75 फुटी पुतळयाची निर्मिती व उद्यान यांचा एकत्रित विकास करणे बाबत आराखडा व अभ्यास दौरा करणे बाबत चर्चा करणे. |
| 17 | लातूर शहर महानगरपालिका बाजूस असलेल्या बाबासाहेब परांजपे मार्ग (जुना सिल्व्हर ज्युबली रोड) या रस्त्याचे डांबरीकरण काम सुरू करणेबाबत चर्चा करणे. |
| 18 | थोर समाजसुधारक क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे यांचा पुर्णाकृती घोडेस्वार पुतळयासाठी जागा निश्चित करुन पुतळा उभारणी करणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे. |
| 19 | मनपा हद्दीच्या ठिकाणी स्वागत बोर्ड बसविणेबाबत चर्चा करणे. |
| 20 | लातूर शहरातील विविध समाजाच्या स्मशानभुमी/ दफनभुमी साठी जागा निश्चित करणे बाबत चर्चा करणे बाबत. |
| 21 | पाणीपुरवठा विभागांतर्गत प्रस्तावित कामांना मान्यता देणेबाबत |
| 22 | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत प्रस्तावित विविध कामांना मंजूरी देणेबाबत चर्चा करणे. |
| 23 | महापालिकेतील पदाधिका-यांना आतिथ्य भत्ता मंजूर करणेबाबत. |
| 24 | लातूर शहर महानगरपालिकेचे सन्मा.सदस्य/सदस्या व अधिकारी यांना चंदीगड व इतर ठिकाणी येथे पाहणी व अभ्यास दौ-यासाठी पाठविणेबाबत निर्णय घेणे. |
| 25 | लातूर शहरात आ. शिवराजजी पाटील चाकूरकर यांचे आदर्श कॉलनी परिसरात स्मारक उभारणी बाबत नागरिकांच्या सूचना मागवूण आराखडा तयार करणे व शासनाचा निधी उपलब्ध करण्याबाबत कार्यवाही करणे बाबत चर्चा करणे. |
| 26 | लातूर शहर महानगरपालिकेच्या बस सेवेचा अहवालावर चर्चा करणे. |
| 27 | होर्डींग्स व युनिपोल धोरणाचा आढावा घेवून त्याबाबत नियमावली आणि धोरण निश्चित करणे. अनाधिकृत होर्डिंग्ज बॅनर बाबत विचार विनिमय करुन बृहत आराखडा तयार करणे. |
| 28 | डॉ.प्रियंका वडजे यांचा सेवेत सामावून घेण्याचा ठराव शासनास पाठविणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे. |

**महापालिका सचिव,**
**लातूर शहर महानगरपालिका, लातूर**